| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| MHPU170020522024 | | दाखल दिनांक | :– | ०१/०८/२०२४ | | |
| | | नोंदणी दिनांक | :– | ०२/०८/२०२४ | | |
| | | निकाल दिनांक | :– | १७/०७/२०२६ | | |
| | | कालावधी | :– | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | | | | ०१ | ११ | १६ |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग इंदापूर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्री. प्र. चं. बारटक्के)**
[ निकाल तारीख १७/०७/२०२६ ]

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२०/२०२४ **निशाणी क्रमांकः– २५.**

| | |
|---|---|
| अर्जदार क्र. १ ते ३ – | **१. सौ.करिश्मा समीर शेख,**<br>वयः–३३ वर्षे धंदाः–काही नाही,<br><br>**२. कु.आसीन समीर शेख,**<br>वयः–१३ वर्षे धंदाः–शिक्षण,<br><br>**३. कु.आर्फिया समीर शेख,**<br>वयः–०९ वर्षे धंदाः–शिक्षण,<br>अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अ.पा.क. जनक आई<br>रा. व्दारा – मुसा शफी शेख,<br>सरस्वतीनगर, इंदापूर,<br>ता. इंदापूर, जि. पुणे. |
| अर्जदारा तर्फे विधीज्ञ – | श्री. एस. बी. खान. |
| जाबदेणार – | **१. समीर सगीर शेख,**<br>वय: ३९ वर्षे, धंदा – नोकरी व व्यवसाय,<br>रा. जयहिंद चौक, राऊतनगर,<br>अकलुज, ता.माळशिरस, जि. सोलापूर. |
| जाबदेणार तर्फे विधिज्ञ – | श्री. ए. एस. धारुरकर |

## न्यायनिर्णय

## ( जाहीर केल्याची तारीख १७/०७/२०२६ )

०१. सदरचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १४४(१) प्रमाणे दाखल केला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे –**

०२. अर्जदार क्र.१ व जाबदेणार हे पती–पत्नी असून, त्यांचा विवाह (निकाह) मुस्लिम धर्मशास्त्राप्रमाणे दिनांक ०६/०५/२०१० रोजी, मौजे इंदापूर, जि. पुणे येथे संपन्न झाला. सदर विवाहाचा संपूर्ण खर्च अर्जदार क्र.१ यांच्या वडीलांनी केला होता. तसेच विवाहावेळी सर्व पाहुण्यांचा मानपान व इतर सर्व व्यवस्था अर्जदार क्र. १ यांच्या आई–वडीलांनी करून विवाह थाटामाटात संपन्न केला. विवाहावेळी अर्जदार क्र.१ यांना मिळालेल्या सर्व भेटवस्तू व संसारोपयोगी साहीत्य सध्या जाबदेणार यांच्या अकलूज येथील राहत्या घरी आहे.

०३. विवाहानंतर अर्जदार क्र. १ या जाबदेणार यांच्यासोबत संसारासाठी मुंबई येथे राहण्यास गेल्या. त्यावेळी जाबदेणार हे मुंबई येथे एका कंपनीत नोकरी करीत होते व त्यांचे कुटुंबही तेथेच वास्तव्यास होते. विवाहानंतर प्रारंभी सुमारे एक वर्ष जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ यांना व्यवस्थित नांदविले. त्यानंतर दिनांक ०४/१०/२०११ रोजी अर्जदार क्र. १ व जाबदेणार यांच्या वैवाहिक संबंधातून अर्जदार क्र. २ हिचा जन्म झाला. सदर गर्भधारणेचा व प्रसूतीचा सर्व खर्च अर्जदार क्र. १ यांच्या वडीलांनी केला. मुलगी झाल्याची माहिती अर्जदार क्र. १ यांनी जाबदेणार यांना दूरध्वनीवरून दिली असता, जाबदेणार यांनी "तुला पाच बहिणी आहेत, मग तुलाही पाच मुलीच होतील," असे अपमानास्पद उद्गार काढले. तसेच अर्जदार क्र. २ च्या जन्मानंतर जाबदेणार अथवा त्यांच्या कुटुंबातील कोणीही अर्जदार क्र. १ व नवजात मुलीस भेटण्यासाठी आले नाही. त्यानंतरही अर्जदार क्र. १ या संसार टिकविण्याच्या हेतूने पुन्हा जाबदेणार यांच्याकडे मुंबई

येथे नांदण्यास गेल्या. मात्र मुलगी झाल्याचे कारण पुढे करून जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी अर्जदार क्र. १ यांचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला, त्यांना सतत अपमानास्पद वागणूक दिली व घालून–पाडून बोलू लागले.

०४. त्यानंतर जानेवारी २०१२ मध्ये जाबदेणार, त्यांचे आई–वडील तसेच अर्जदार क्र. १ व २ हे सर्वजण अकलूज येथे राहण्यासाठी आले. अकलूज येथे आल्यानंतरही जाबदेणार व त्यांच्या आई–वडीलांनी अर्जदार क्र. १ यांचा सातत्याने शारीरिक व मानसिक छळ केला. जाबदेणार कोणताही व्यवसाय अथवा नोकरी न करता दिवसभर घरीच राहत असत. अर्जदार क्र. १ यांनी त्यांना वारंवार काहीतरी कामधंदा करण्याबाबत सांगितले असता, त्यांनी त्यांचे म्हणणे न ऐकता उलट अर्जदार क्र. १ यांना अश्लील शिवीगाळ करून अपमानित केले. तरीदेखील संसार टिकावा व वैवाहिक जीवन अबाधित राहावे या प्रामाणिक हेतूने अर्जदार क्र. १ जाबदेणार यांच्यासोबत नांदत राहिल्या.

०५. एप्रिल २०१२ मध्ये जाबदेणार यांचे भाऊ अब्दुलकादिर यांचा विवाह अकलूज येथे झाला. त्या विवाहानंतर जाबदेणार व त्यांच्या आई–वडीलांनी अर्जदार क्र. १ यांना, "आमच्या धाकट्या सुनेने लग्नात भरपूर सोने आणले आहे, तुझ्या वडीलांनी तुझ्या लग्नात काहीच दिले नाही," असे म्हणून त्यांचा सतत मानसिक छळ सुरू केला. अर्जदार क्र. १ यांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, जाबदेणार यांचा भाऊ त्यांना मारहाण करण्यासाठी धावून आला. ही बाब अर्जदार क्र. १ यांनी जाबदेणार यांच्या निदर्शनास आणून दिली; मात्र त्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. पुढे जाबदेणार आजारी पडल्यानंतर त्याचा सर्व दोष अर्जदार क्र. १ यांच्यावर टाकण्यात आला आणि जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी अर्जदार क्र. १ यांना अर्जदार क्र. २ हिच्यासह राहत्या घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार क्र. १ या मुलीसह माहेरी राहू लागल्या. त्या काळात जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ व २ यांची कोणतीही विचारपूस केली नाही. उलट अर्जदार क्र. १ यांनी दूरध्वनीवरून त्यांना पुन्हा नांदविण्याची विनंती केली असता, जाबदेणार यांनी

शिवीगाळ करून "मी तुला नांदायला घेऊन जाणार नाही, मी दुसरे लग्न करणार आहे," असे स्पष्ट सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र. १ यांच्या आई–वडीलांनी व इतर नातेवाईकांनीही जाबदेणार यांना समजावून सांगून अर्जदार क्र. १ व २ यांना परत घेऊन जाण्याची विनंती केली; मात्र त्यांनी त्यांनाही शिवीगाळ करून, "आम्ही अर्जदार क्र. १ हिला नांदवणार नाही, तुम्हाला जे करायचे ते करा," असे सांगून स्पष्ट नकार दिला.

०६. सततच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून अर्जदार क्र. १ यांनी इंदापूर येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १२५ अन्वये पोटगीसाठी एम. ए. क्र. ४८/२०१२ हा अर्ज दाखल केला. सदर प्रकरणात जाबदेणार यांनी तडजोड करून यापुढे अर्जदार क्र. १ यांना कोणताही त्रास देणार नसल्याचा विश्वास अर्जदार क्र. १ तसेच त्यांच्या आई–वडिलांना दिला. त्यानुसार दिनांक १२/१२/२०१२ रोजी त्यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना पुन्हा नांदावयास नेले. त्याबाबत तडजोडीची पुरशीस दाखल झाल्याने सदर प्रकरण निकाली निघाले. तथापि, अर्जदार क्र.१ पुन्हा जाबदेणार यांच्याकडे राहण्यास गेल्यानंतर जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांनी, "तू आम्हाला कोर्टाची पायरी चढायला लावलीस व आमची सर्वत्र बदनामी केलीस," असे म्हणत पुन्हा अर्जदार क्र. १ व २ यांचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला.

०७. त्यानंतरही जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांकडून अर्जदार क्र. १ यांना सातत्याने शारीरिक व मानसिक त्रास दिला जात होता. त्यामुळे अर्जदार क्र.१ यांनी दिनांक २२/०८/२०१४ रोजी अकलूज पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. सदर तक्रारीनंतर पोलीस अधिकाऱ्यांनी जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांना पोलीस ठाण्यात बोलावून समज दिली. त्यावेळी त्यांनी अर्जदार क्र. १ यांची माफी मागून यापुढे त्रास देणार नसल्याचे आश्वासन दिले व अर्जदार क्र. १ यांना पुन्हा नांदावयास घेऊन गेले.

०८. त्यानंतर दिनांक २०/१०/२०१८ रोजी जाबदेणार हे अर्जदार क्र. १ यांच्या माहेरी, इंदापूर येथे येऊन अर्जदार क्र. १ तसेच त्यांच्या आई–वडिलांना शिवीगाळ करून दमदाटी केली. सदर घटनेबाबत अर्जदार क्र. १ यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा आर.सी.सी. क्र. ४६४/२०१८ म्हणून इंदापूर न्यायालयात चालविण्यात आला. सदर खटल्यात मा. न्यायालयाने जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांची निर्दोष मुक्तता केली. तथापि, सदर निर्णयाविरुद्ध अर्जदार क्र. १ यांनी बारामती येथील सत्र न्यायालयात फौजदारी अपील क्र. २८/२०२३ दाखल केले असून ते सध्या प्रलंबित आहे. तसेच महाराष्ट्र शासनानेही सदर निर्णयाविरुद्ध स्वतंत्र अपील दाखल केले असून त्यासंबंधीचा फौ. कि. अर्ज क्र. ०५/२०२४ हा विलंब माफीच्या मुद्यावर प्रलंबित आहे.

०९. अर्जदार क्र. १ यांना घराबाहेर काढल्यानंतर जाबदेणार पुन्हा मुंबई येथे एका कंपनीत नोकरीस लागले असून त्यांना दरमहा सुमारे रु. १५,०००/– इतका पगार मिळत होता. याशिवाय मुंबई येथील पवई, मिलिंदनगर येथे त्यांचे स्वतःचे दुमजली घर असून त्यापासून दरमहा सुमारे रु. १५,०००/– इतके भाडे उत्पन्न मिळते. तसेच राऊतनगर, अकलूज येथे त्यांचे चार खोल्यांचे स्वतःचे घर आहे. गाव मौजे लुमेवाडी येथे त्यांची सुमारे एक एकर बागायती शेती असून त्यातून वार्षिक सुमारे रु. २,००,०००/– इतके निव्वळ उत्पन्न मिळते. याशिवाय अकलूज येथील राहत्या घरासमोर त्यांचे किराणा दुकान असून त्यापासून दरमहा सुमारे रु. ४०,०००/– ते रु. ५०,०००/– इतके उत्पन्न मिळते. अशा प्रकारे जाबदेणार आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही त्यांनी अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली आहे.

१०. याउलट अर्जदार क्र. १ यांच्या माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. अर्जदार क्र. १ यांच्यानंतर त्यांच्या आई–वडिलांना आणखी चार मुली व एक मुलगा असून, मुलींचे विवाह झालेले आहेत तर मुलाचे शिक्षण सुरू आहे. त्यामुळे

अर्जदार क्र. १ यांच्या वडिलांना अर्जदार क्र. १ ते ३ यांचा उदरनिर्वाह करणे शक्य नाही. अर्जदार क्र. १ यांना स्वतःचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नाही. जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ तसेच अर्जदार क्र. २ व ३ यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार किंवा इतर आवश्यक गरजांची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदार सध्या नातेवाईक व पाहुण्यांच्या मदतीवर आश्रित जीवन जगत आहेत. जाबदेणार यांच्या वागणुकीमुळे अर्जदारांचे वैवाहिक व कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त झाले आहे. म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ यांनी जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ मधील कलम १२, १८, १९, २० व २२ अन्वये क्रि. अर्ज क्र. ४५१/२०१८ दाखल केला होता. सदर अर्जावर गुणदोषांवर सुनावणी होऊन मा. न्यायालयाने दिनांक १४/०९/२०२२ रोजी अर्ज अंशतः मंजूर केला. त्या आदेशानुसार अर्जदार क्र. १ यांना दरमहा रु. ३,०००/-, अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु. २,०००/- चरितार्थासाठी देण्याचा आदेश करण्यात आला. तसेच अर्जदार क्र. १ यांना घरभाड्यासाठी दरमहा रु. ३,०००/- देण्याचा आदेशही पारित करण्यात आला. याशिवाय जाबदेणार व त्यांच्या कुटुंबीयांना अर्जदार क्र. १ यांना रु. ३०,०००/- नुकसानभरपाई अदा करण्याचाही आदेश देण्यात आला.

११. सदर आदेशाविरुद्ध जाबदेणार यांनी जिल्हा न्यायालय, बारामती येथे अपील दाखल केले असून विलंब माफीसंबंधीचे कामकाज क्रि. एम. ए. क्र. २६/२०२४ मध्ये प्रलंबित आहे. तसेच सदर आदेशाच्या अंमलबजावणीसाठी अर्जदार क्र. १ ते ३ यांनी याच न्यायालयात ओ. एम. ए. क्र. ८२/२०२२ व एम. ए. क्र. ४२२/२०२३ असे दोन वसुली अर्ज दाखल केले असून तेही सध्या प्रलंबित आहेत.

१२. असे असूनही जाबदेणार न्यायालयाच्या आदेशानुसार नियमितपणे पोटगीची रक्कम अदा करीत नाहीत. सध्या अर्जदार क्र. २ ही इयत्ता सातवीत इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत असून अर्जदार क्र. ३ ही इयत्ता चौथीत शिक्षण घेत आहे. दोन्ही मुलींचा

वार्षिक शैक्षणिक खर्च सुमारे रु. २५,०००/– ते रु. ३०,०००/– इतका आहे. जाबदेणार नियमितपणे पोटगी न भरल्यामुळे अर्जदारांना दैनंदिन जीवनावश्यक गरजा भागविणेही कठीण झाले आहे. अर्जदार क्र. १ व जाबदेणार हे दिनांक २०/०६/२०१८ पासून विभक्त राहत आहेत. त्या दिवसापासून आजतागायत जाबदेणार यांनी अर्जदारांची साधी विचारपूसही केलेली नाही. त्यामुळे त्यांनी अर्जदारांचा प्रत्यक्ष त्याग केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांना स्वतःचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्न नसल्याने अर्जदार क्र. १ ते ३ हे पूर्णपणे आश्रित जीवन जगत आहेत. दिनांक ०८/०७/२०२४ रोजी अर्जदार क्र. १ यांनी न्यायालयात जाबदेणार यांना नियमितपणे पोटगी अदा करण्याची विनंती केली होती; परंतु त्यांनी त्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल करून अर्जदार क्र. १ ते ३ यांना जाबदेणार याने प्रत्येकी दरमहा रु.१०,०००/– पोटगी देण्याबाबत आदेश पारित करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

१३. जाबदेणार हा सदर प्रकरणात हजर होवून त्याचे लेखी म्हणणे सादर केले. त्यामध्ये अर्जदारने केलेले सर्व आरोप त्याने नाकारले आहेत. जाबदेणार याने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ व जाबदेणार यांचा विवाह दिनांक ०६/०५/२०१० रोजी इंदापूर येथे मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला. विवाहाचा खर्च दोन्ही कुटुंबानी संयुक्तपणे केला होता. विवाहानंतर अर्जदार प्रथम अकलूज व त्यानंतर जाबदेणार यांचयसोबत मुंबई येथे वास्तव्यास गेली. प्रारंभीचा वैवाहीक संसार सुरळीत सुरु होता. जाबदेणा यांनी विवाहानंतर अर्जदाराची योग्य प्रकारे काळजी घेतली. अर्जदार गर्भवती असताना तिच्या औषधोपचाराची, वैद्यकीच उपचाराची तसेच इतर सर्व आवश्यक गरजांची पुर्तता जाबदेणार यांनी केली आहे. दिनांक ०४/१०/२०११ रोजी मुलगी असीन हिचा जन्म झाला, त्यावेळीही जाबदेणार तिच्यासोबत रुग्णालयात उपस्थित होते. मुलीच्या जन्मानंतर अर्जदार माहेरी गेल्यानंतर जाबदेणार तिला परत आणण्यासाठी इंदापूर येथे गेले असता अर्जदारच्या आई–वडीलांनी तिला पाठविण्यास नकार दिला. त्यानंतर अर्जदारने पोटगीचा अर्ज दाखल केला. मात्र त्या प्रकरणात न्यायालयासमोर तडजोड होऊन अर्जदार

पुन्हा जाबेदणारकडे नांदण्यास आली. यावरुन जाबदेणार यांची पत्नीला नांदविण्याची प्रामाणिक इच्छा स्पष्ट होते.

१४. अर्जदारने वारंवार मुंबई सोडून अकलूज येथे स्वतंत्र राहण्याचा आग्रह धरला. जाबदेणार मुंबई येथे नोकरी करत असल्यामुळे तेथेच वास्तव्यास राहणे आवश्यक असतानाही संसार टिकावा या हेतूने त्यांनी स्वतःची नोकरी व स्थैर्य यांचा त्याग करुन सन २०१३ मध्ये अकलुज येथे स्वतंत्र संसार सुरु केला. अकलूज येथे राहताना अर्जदार वारंवार माहेरी इंदापूर येथे अनेक दिवस राहत असे. जाबदेणार यांनी वेळोवेळी समजूत काढून संसार टिकविण्याचा प्रयत्न केला, मात्र अर्जदारच्या वर्तनात कोणताही बदल झाला नाही. दुसरी मुलगी आर्फिया हिचा जन्म दिनांक ०१/१२/२०१५ रोजी झाला. त्यानंतरही जाबदेणार यांनी संसार टिकविण्याचा सातत्याने प्रयत्न केला. दिनांक ०३/०५/२०१८ रोजी उन्हाळी सुट्टीसाठी अर्जदार व मुलींना इंदापूर येथे सोडण्यात आले. सुट्टीनंतर जाबदेणार स्वतः त्यांना परत आणण्यासाठी गेले असता अर्जदार व तिच्या पालकांनी स्पष्ट नकार दिला. मोठी मुलगी असीन हिचे सराटी येथील शाळेतील प्रवेशदेखील अर्जदाराने रद्द केला. यावरुन अर्जदारने स्वतःच्या इच्छेने वैवाहीक सहजीवनाचा त्याग केल्याचे स्पष्ट होते. अर्जदार दिनांक ०३/०५/२०१८ पासून स्वतःच्या इच्छेने माहेरी राहत असून, जाबदेणार यांनी तिला परत आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना तिने प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे जाबेदणार यांनी तिला सोडून दिले असा आरोप वस्तुस्थिती विरुध्द आहे.

१५. अर्जदारने जाबदेणार व त्यांच्या कुटूंबियां विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ, ३२३, ५०४ आणि ५०६ इत्यादी कलमान्वये दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणात सक्षम न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. ही बाब अर्जदारने केलेल्या गंभीर आरोपांना न्यायालयीन पुष्टी मिळालेली नसल्याचे दर्शविते. अर्जदारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियमांतर्गत दाखल केलेल्या प्रकरणात दिलेल्या अंतिम

आदेशाविरुध्द जाबदेणार यांनी अपील दाखल केले असून, अपील न्यायप्रविष्ट आहे. वरिष्ठ न्यायालयाने दिनांक १२/११/२०२४ रोजी मूळ आदेशास स्थगिती देऊन अपील प्रलंबित असताना दरमहा रक्कम रुपये ३,०००/– अंतरिम पोटगी देण्याचा आदेश केला आहे. जाबदेणार सदर आदेशाचे पालन करीत आहेत. सदर परिस्थितीत पोटगीसंदर्भातील प्रश्न सक्षम न्यायालयासमोर आधीपासूनच विचाराधीन असून त्याबाबत अपील प्रलंबित आहे. त्यामुळे त्याच स्वरुपाचा स्वतंत्र दावा दाखल करुन एकाच विषयावर पुनश्च पोटगी मागणी कायद्याच्या दृष्टीने ग्राह्य धरता येत नाही. अर्जदारने स्वतः ब्युटी पार्लरचा कोर्स पुर्ण केलेली असून, स्वतः उत्पन्न मिळविण्याची क्षमता तिच्यात आहे. याउलट जाबदेणार यांनी संसार टिकविण्यासाठी मुंबईतील नोकरी सोडल्यामुहे ते आर्थिकदृष्टया अडचणीत आले आहेत. त्यांच्या नावावर कोणतीही शेती अथवा स्थिर उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. अर्जदार हिने विविध न्यायालयांमध्ये अनेक दावे व फौजदारी प्रकरणे दाखल केलेली असून, त्यापैकी काही प्रकरणे प्रलंबित आहेत तर काहींमध्ये जाबदेणार निर्दोष मुक्त झालेले आहेत. या सर्व बाबींचा एकत्रीत विचार करता प्रस्तुत अर्ज हा पुर्वीपासून प्रलंबित असलेल्या कार्यवाहीच्या पार्श्वभूमीवर दाखल झालेला असून त्यामध्ये नव्याने स्वतंत्र दिलासा देण्याचे कोणतेही कायदेशीर कारण उपलबध नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १४४ अंतर्गत पोटगी देताना अर्जदारने स्वतः विनाकारण पतीचा त्याग केला आहे का, याचाही विचार करणे आहे. प्रस्तुत प्रकरणातील घटनाक्रमावरुन अर्जदार स्वतःच्या इच्छेने माहेरी वास्तव्यास राहीली असून जाबदेणार यांनी तिला परत आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. जाबदेणार यांनी पत्नी व मुलींना नांदविण्याची इच्छा कधीही सोडलेली नाही. उलट अर्जदारनेच वैवाहीक सहजीवनास नकार दिला असून त्याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर उपलबध पुराव्यांतून नष्ट होते. अंततः जाबदेणार यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१६. माझेसाठी उपस्थित झालेले विचाराधीन मुद्दे आणि त्यावरील माझे सकारण निष्कर्ष हे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारांनी असे सिध्द केले आहे काय की, ते स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ आहेत ? | होय. |
| २. | अर्जदारांनी असे सिध्द केले आहे काय की, जाबदेणार याने पुरेशी ऐपत असताना, त्यांचा निर्वाह करण्याबाबतची उपेक्षा केली? | अंशतः होय. |
| ३. | अर्जदार त्यांच्या मागणीप्रमाणे जाबदेणार विरुध्द कलम १४४ अन्वये निर्वाह करिता आदेश होवून मिळण्यास पात्र आहेत काय? | अंशतः होय. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

१७. अर्जदार यांनी अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार क्र.१ करिष्मा हिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.१६ कडे दाखल केले आहे. तसेच अर्जदारने खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. बोनाफाईड दाखला निशाणी १८ व २२,

२. पावत्या निशाणी १९ ते २१

१८. त्यानंतर अर्जदारने निशाणी २३ कडे पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला.

१९. बचावामध्ये जाबदेणार याने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी २३ कडे दाखल केले. जाबदेणार याने बचावामध्ये कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत.

२०. त्यानंतर जाबदेणार यांनी निशाणी २४ कडे पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला.

२१. अर्जदारने तिचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र निशाणी ७ कडे दाखल केले आहे. जाबदेणार याने मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही.

२२. अर्जदारच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदारने सबळ पुरावा देवून जाबदेणार याने पुरेशी ऐपत असताना, अर्जदारांच्या निर्वाहची उपेक्षा केल्याचे तसेच अर्जदार हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द केले आहे. अर्जदार क्र.२ व ३ यांच्या वाढत्या वयाचा व शिक्षणाच्या खर्चाचा विचार केल्यास अर्जदार यांना किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील आदेशानुसार देण्यात आलेल्या निर्वाह भत्याची रक्कम पुरेशी नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती अर्जदाराच्या विधीज्ञांनी केली. अर्जदारच्या विधीज्ञानी युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाड्यांचा दाखला दिला.

***१. भाग्यश्री चौधरी वि. पुरुषोत्तम चौधरी, २०२३ ऑल एम आर (क्रि.) २४५***

***२. शमीमा फारुकी वि. साहील खान, २०१५ ऑल एम आर(क्रि.) २०४६(एस.सी.)***

***३. मोहम्मद समद वि. तेलंगणा राज्य, २०२४ ऑल एस सी आर (क्रि.) १४३७***

सदर प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाने व मा. सर्वोच्च न्यायालयाने असा निष्कर्ष नोंदविला आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये व महीलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत अशा दोन्ही कायद्यान्वये अर्जदारास वेगवेगळा निर्वाह भत्ता मागता येतो. जाबदेणारास नोकरी नाही अथवा व्यवसाय उत्तम सुरु नाही या कारणास्तव निर्वाह भत्ता नाकारता येणार नाही. विवाह विच्छेदनानंतर जो पर्यंत पत्नी दुसरा विवाह करित नाही तो पर्यंत तिला फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १२५ अंतर्गत निर्वाह भत्याची मागणी करण्याचा अधिकार आहे.

२३. याउलट, जाबदेणार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, जाबदेणार यांनी बचावातून अर्जदारने स्वतःहून जाबदेणार यांचा त्याग केल्याचे सिध्द केले आहे. तसेच अर्जदारने जाबदेणार यांना शारीरीक व मानसिक त्रास दिल्याचे स्पष्ट केले आहे.

अर्जदारास किरकोळ अर्ज क्रमांक ४५१/२०१८ या प्रकरणात मंजूर झालेला निर्वाह भत्ता व त्यावरील अपीलातील आदेशानुसार जाबदेणार निर्वाह भत्याची रक्कम नियमीतपणे भरत आहे. सदर रक्कम पुरेशी असून त्या व्यतिरिक्त पुन्हा वाढीव निर्वाह भत्ता देण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. अर्जदार यांनी परिस्थितीमध्ये बदल झालेबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. पुन्हा वेगळा निर्वाह भत्ता देण्याची जाबदेणार याची ऐपत नाही. त्यामुळे अर्जदार त्यांच्या मागणीप्रमाणे जाबदेणार याच्याविरुध्द निर्वाह भत्याबात आदेश होवून मिळण्यास पात्र नाहीत.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३</u>**

२४. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १४४ (१) अन्वये पुरेशी ऐपत असताना जर कोणत्याही इसमाने स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या त्याच्या पत्नीचा व अपत्याचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली किंवा तो करण्यास नकार दिला तर, अशी उपेक्षा किंवा नकार शाबीत झाल्यानंतर पत्नीच्या व अपत्याच्या उदर निर्वाहा करीता सदर इसमाने दंडाधिकाऱ्याला योग्य वाटेल त्या मासीक दराने भत्ता द्यावा असे आदेश देता येतील.

२५. अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह झाल्याची बाब, अर्जदार व जाबदेणार यांना अर्जदार क्र.२ व ३ ही अपत्ये असल्याची बाब, अर्जदारने कौटुंबिक हिंसाचार कायद्या अंतर्गत दाखल केलेल्या किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मध्ये दिनांक १४/०९/२०२२ रोजी आदेश पारित होवून जाबदेणार याने अर्जदार यांना निर्वाह भत्ता व घर भाड्याची एकत्रीतपणे रक्कम रुपये १०,०००/– प्रती माह देण्याबाबत आदेश पारित झाल्याची बाब व त्यावरिल अपील क्र.२६/२०२४ या प्रकरणात फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील आदेशास स्थगिती देवून जाबदेणार याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ३०००/– देण्याबाबतचे आदेश पारित करण्यात आल्याची बाब, इत्यादी बाबी उभय पक्षकारांमध्ये निर्विवाद आहेत.

२६. अर्जदारने तिच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. अर्जदारने असे कथन केले की, जाबदेणार याने व जाबदेणार याच्या कुटुंबियांनी विवाहानंतर तिला किरकोळ कारणावरुन तसेच मुलगी झाल्याच्या कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास दिला. जाबदेणार याने तिला नांदविण्यास नकार दिला. जाबदेणार याने तिचा त्याग केला. जाबदेणार याने दिनांक २०/०६/२०१८ रोजी तिला मारहाण करुन घरातून हाकलून दिले. तेंव्हापासून ती नातेवाईकांच्या दयेवर आश्रिताचे जीवन जगत आहे. जाबदेणाराने त्यानंतर त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या उलट जाबदेणार यास नोकरीतुन दर महा रक्कम रुपये १५,०००/– उत्पन्न मिळत होते. तसेच जाबदेणार यास मुंबई येथील घराचे भाडे दरमहा रक्कम रुपये १५,०००/– मिळते. जाबदेणार याचे अकलुज येथे चार खोल्यांचे घर आहे व लुमेवाडी येथे एक एकर बागायती शेतजमीन आहे. जाबदेणार यास शेत जमीनीमधून दरवर्षी रक्कम रुपये २,००,०००/– उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार याचे किराणा दुकान असून, त्याधून जाबदेणार यास दरमहा रक्कम रुपये ४०,०००/– ते ५०,०००/– उत्पन्न मिळते. जाबदेणार हा निर्वाह भत्याची रक्कम नियमीतपणे भरण्यास नकार देत आहे.

२७. उलट तपासामध्ये अर्जदाराने असे कबूल केले की, जाबदेणार हा अपीलातील आदेशानुसार दरमहा रक्कम रुपये ३०००/– तिला देत आहे. पुढे उलट तपासामध्ये अर्जदारने तिचा ब्युटी पार्लरचा कोर्स झाल्याचे व तिच्या घरी ब्युटी पार्लर सुरु असल्याचे नाकारले. तसेच विवाहाच्या तीन महीन्यानंतर ती कामे व्यवस्थित करत नव्हती हे नाकारले आहे. पुढे तिने तिची मुलगी दोन महीन्याची झाल्यानंतर जाबदेणार तिला नांदायला नेण्यासाठी तिच्या माहेरी आल्याचे व त्यावेळी तिने नांदायला जाण्यास नकार दिल्याचे नाकारले. तसेच तिची सुरुवातीपासून नांदायची इच्छा नसल्याचे नाकारले. पुढे अर्जदारने जाबदेणारकडे कोणताही काम धंदा नसल्याचे नाकारले. अर्जदारने असे कथन केले की, जाबदेणार अकलुज येथे बॅटरीच्या दुकानात काम करीत होता. मात्र त्या दुकानाचे नाव तिला सांगता आलेले नाही. तसेच त्याबाबत पुरावा दाखल करता येणार नाही असे

तिने कथन केले. अर्जदारने उलट तपासात जाबेदणार याचा स्वतःहून त्याग केलाचे नाकारले.

२८. जाबदेणार याने सरतपासात म्हणण्यातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. जाबदेणार याने असे कथन केले की, अर्जदारने त्याचा स्वतःहून त्याग केला आहे. त्याने अर्जदारांना नांदविण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले. मात्र अर्जदारने नांदण्यास नकार दिला आहे. तो बेरोजगारीचे जीवन जगत आहे. त्याचेकडे शेती नाही.

२९. उलट तपासामध्ये जाबदेणार याने त्याचे शिक्षण १२ वी पर्यंत झाल्याचे कथन केले. तसेच जाबेदणार याने पुढे असे कथन केले की, अपघातामुळे त्याला मणक्याचा त्रास असून, जड वस्तु उचलता येत नाही व जड काम करता येत नाही. मात्र पुढे त्याने त्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार नसल्याचे कथन केले. पुढे त्याने त्याचे दोन्ही भाऊ उत्पन्न मिळवित असून मुंबई येथे त्याच्या लहान भावाचे घर असल्याचे कथन केले. मात्र मुंबई येथील घर लहान भावाचे आहे असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार नसल्याचे कथन केले. पुढे जाबदेणार याने अकलुज येथे घरासमोर त्याचे दुकान असल्याचे नाकारले. त्याने दिनांक ०३/०५/२०१८ पासून अर्जदारपासून विभक्त राहत असल्याचे कबूल केले. तसेच अर्जदार क्र.२ व ३ या दोन्ही मुली अर्जदार क्र.१ कडे राहत असल्याचे कबूल केले. दिनांक ०३/०५/२०१८ रोजी त्याने रक्कम रुपये ५०००/– अर्जदारला दिल्याचे कथन केले. तसेच न्यायालयात भरलेल्या निर्वाह भत्याव्यतिरिक्त दिनांक ०३/०५/२०१८ पासून त्याने अर्जदारांच्या सांभाळाची व निर्वाहाची इतर कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे कबूल केले. त्याने अर्जदारला मुलगी झाल्याने तिचा शारिरिक व मानसिक छळ केल्याचे नाकारले. तसेच अर्जदारला परत नांदायला नेण्यासाठी प्रयत्न केले नाहीत ही सुचना नाकारली. त्याने बारामती येथील न्यायालयात एक रक्कमी ४०,०००/– भरल्याचे व येरवडा कारागृहातून मुक्तता झाली त्यावेळी एक रक्कमी १,००,०००/– न्यायालयात भरल्याचे कबूल केले.

त्याने बॅटरीच्या दुकानात काम करित असल्याचे व दरमहा ४० ते ५० हजार रुपये उत्पन्न मिळवित असल्याचे नाकारले. त्याने लुमेवाडी येथे त्याच्या वडीलांची एक एकर शेती असल्याचे कबूल केले. ती शेती विकली असल्याचे त्याला माहीत नाही असे कथन केले. तसेच सन २०१९–२०२० नंतर आजपर्यंत अर्जदारशी बोलणे झाले नसल्याचे कबूल केले. अर्जदार सध्या तिच्या वडीलांकडे राहत असल्याचे कबूले केले. मात्र अर्जदार यांना घराबाहेर काढल्याचे, त्यांचा निर्वाह करण्याची उपेक्षा केल्याचे, तो अर्जदारांना निर्वाह भत्ता देण्यास सक्षम असल्याचे व अर्जदारकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे नाकारले.

३०. अर्जदार व जाबदेणार यांनी उलट तपासामध्ये एकमेकांसोबत नांदण्याकरिता नोटीस पाठविली नसल्याचे व न्यायालयात अर्ज दाखल केले नसल्याचे कथन केलेले आहे.

३१. अर्जदार व जाबदेणार यांच्या वरिल साक्षी पुराव्यातून अर्जदार व जाबदेणार हे दिनांक ०३/०५/२०१८ पासून विभक्त राहत असल्याची बाब स्पष्ट झालेली आहे. तसेच जाबदेणार याने निर्वाह भत्याच्या रक्कमे व्यतिरिक्त अर्जदार यांच्या सांभाळाकरिता व निर्वाहाकरिता इतर कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे देखील स्पष्ट झालेले आहे. अर्जदारने सरतपासात व निशाणी ७ कडील मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये तिच्याकडे उत्पन्नाचे साधन नसल्याचे कथन केले आहे. अर्जदारकडे उत्पन्नाचे साधन आहे याबाबत जाबदेणार याच्या तोंडी कथना व्यतिरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे जाबदेणार यास नोकरीतून, घर भाड्यातून, शेतीतून व किराणा दुकानातून उत्पन्न मिळते असे दर्शविणारा अर्जदारचे तोंडी कथना व्यतिरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही.

३२. अर्जदारतर्फे दाखल कागदपत्रातून अर्जदार क्र.२ व ३ हे शिक्षण घेत असून, त्यांच्या शिक्षणाकरिता अर्जदार खर्च करित असल्याचे दिसून येते. अर्जदार व जाबदेणार

यांच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यातून जाबदेणार हा अपीलातील आदेशानुसार अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ३०००/– निर्वाह भत्याची रक्कम देत असल्याची बाब स्पष्ट झालेली आहे. फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील दिनांक १४/०९/२०२२ रोजीच्या आदेशानुसार अर्जदार क्र.१ हिस दरमहा रक्कम रुपये ३०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये २०००/– निर्वाभत्ता तसेच दरमहा रक्कम रुपये ३०००/– घरभाडे असे एकूण दरमहा रक्कम रुपये १०,०००/– जाबदेणार याने अर्जदार यांना देण्याबाबत आदेश पारित करण्यात आलेला असून, त्यावरिल अपील सध्या प्रलंबित आहे.

३३. अर्जदारतर्फे दाखल वर नमूद ***भाग्यश्री चौधरी*** या प्रकरणातील मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाच्या निष्कर्षानुसार महीलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत तसेच फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १२५ अंतर्गत निर्वाह भत्याबाबत अर्जदारास वेगवेगळा अर्ज देवून निर्वाह भत्याची मागणी करता येईल. सदर प्रकरणात कुटुंब न्यायालयाने महीलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत अर्जदारास पुर्वीच निर्वाह भत्ता मंजूर केला असल्याच्या एकमेव कारणावरुन फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १२५ अंतर्गतचा अर्ज नामंजूर केला. मा. औरंगाबाद खंडपीठाने सदरचा आदेश रद्द केला व असा निष्कर्ष नोंदविला की, महीलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत अर्जदारास पुर्वीच निर्वाह भत्ता मंजूर झाल्याच्या कारणावरुन अर्जदारास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये अर्ज दाखल करण्यास रोध निर्माण होत नाही.

३४. मा. औरंगाबाद खंडपीठाच्या वरिल नमूद ***भाग्यश्री चौधरीच्या*** प्रकरणातील निष्कर्षानुसार अर्जदार प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट होते. मात्र मा.सर्वोच्च न्यायालयाच्या **रजनिश** विरुध्द **नेहा (२०२१) २ एस.सी.सी. ३२४** या प्रकरणातील निष्कर्षानुसार पुर्वीच्या आदेशानुसार पारित करण्यात आलेला निर्वाह भत्ता हा

पुन्हा वेगळ्या तरतुदी अंतर्गत निर्वाह भत्ता मंजूर करते वेळेस विचारात घेणे आवश्यक आहे.

३५. अर्जदारने प्रामाणिकपणे पुर्वीच्या फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील दिनांक १४/०९/२०२२ रोजीच्या आदेशानुसार तिला व अर्जदार क्र.२ आणि ३ यांना जाबदेणार याने एकूण दरमहा रक्कम रुपये १०,०००/– देण्याबाबत आदेश पारित करण्यात आल्याचे कथन केले आहे. अपीलातील अंतरिम आदेशानुसार जाबदेणार यास अर्जदार याने दरमहा रक्कम रुपये ३०००/– देण्याबाबत आदेश पारित करण्यात आला आहे. मात्र अद्यापी दिनांक १४/०९/२०२२ रोजीचा आदेश रद्द झालेला नाही. त्यामुळे सदर आदेश प्रस्तुत कामी विचारात घेणे आवश्यक आहे.

३६. वरिल चर्चेतून असे स्पष्ट झाले आहे की, अर्जदार यांनी जाबदेणार यास नोकरीतून, घरभाडयातून, शेतीतून व दुकानातून उत्पन्न मिळत असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. मात्र जाबदेणारास नेमके किती उत्पन्न मिळते ही बाब वैयक्तीक ज्ञानातील असल्याने त्याबाबत खुलासा करण्याची जबाबदारी जाबदेणार याची आहे. त्याकरिता वर नमूद ***रजनिश*** *विरुध्द* ***नेहा*** या प्रकरणातील मा.सर्वोच्च् न्यायालयाच्या आदेशानुसार जाबदेणाराने प्रस्तुत प्रकरणात मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे. मात्र जाबदेणार याने तसे प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. त्याचप्रमाणे उलट तपासामध्ये जाबदेणार याने मुंबई येथील घराबाबत कागदपत्र दाखल करण्यास नकार दिला आहे. त्यास मणक्याचा आजार असल्याबाबत कागदपत्र दाखल करण्यास नकार दिला आहे. सदर बाबी महत्वाच्या असून जाबदेणार याने त्याबाबत खुलासा केलेला नाही व कागदपत्र दाखल केलेले नाहीत. अशा परिस्थितीत वर नमूद ***रजनिश*** *विरुध्द* ***नेहा*** या प्रकरणातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्देशानुसार जाबदेणार याचेविरुध्द प्रतिकुल अनुमान काढता येईल. अशा परिस्थितीत जरी जाबदेणार याचे नेमके उत्पन्न स्पष्ट होत नसले तरी जाबदेणार यास उत्पन्नाचे साधन आहे व जाबदेणार हा चांगले उत्पन्न मिळवितो असा अनुमान निघतो.

३७. जाबदेणार याची त्याच्या पत्नीला व मुलाला सांभाळण्याची व त्यांच्या उदर निर्वाहाची तरतुद करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदाराच्या पुराव्यातुन जाबदेणार तिचा पती असुन ती उदरनिर्वाहाकरीता जाबदेणार याच्यावर अवलंबुन असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे स्पष्ट होते. तसेच जाबदेणार याने अर्जदार हिस मारहाण करुन घरातुन हाकलुन दिल्याची बाब समोर येते. त्याचप्रमाणे जाबदेणार हा अर्जदारास न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निर्वाहाची रक्कम देत असल्याची बाब समोर आली आहे. मात्र या व्यतिरिक्त जाबदेणार याने अर्जदारांची इतर कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते.

३८. वरील चर्चेतुन जाबदेणार हा चांगले उत्पन्न मिळवित असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्याची पुरेशी ऐपत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अर्जदार व जाबदेणार यांची एकंदरीत परिस्थिती पाहता, फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील दिनांक १४/०९/२०२२ रोजीच्या आदेश पाहता, तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे वाढते वय व शिक्षणाचा खर्च पाहता मी या मताचा आहे की, अर्जदार हे जाबदेणार याचेकडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १४४ नुसार निर्वाह भत्याची रक्कम मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, मुद्दा क्रमांक १ ते ३ मधील बाबी सिध्द झालेल्या आहेत. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर '**होय**' व मुद्दा क्र. २ आणि ३ चे उत्तर '**अंशतः होय**' असे नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ४

३९. अर्जदाराने तिला निर्वाह भत्ता मिळण्याचा अधिकार आहे हे सिध्द केलेले आहे. एकंदरीत जाबदेणारचे उत्पन्न आणि अर्जदाराच्या आणि तिच्या अपत्यांचा उदरनिर्वाहाचा, कपडे–लत्याचा व औषधोपचाराचा खर्च आणि अर्जदार व जाबदेणार यांचे राहणीमान व महागाई पाहता, तसेच फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४५१/२०१८ मधील दिनांक १४/०९/२०२२ रोजीचा आदेश पाहता, जाबदेणार याने अर्जदार क्र.१ ते ३

यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ५००/– इतका निर्वाह भत्ता देणे आवश्यक आहे असे मी समजतो. जाबदेणार याने अर्जदार हिस अर्ज दाखल तारीख ३१/०७/२०२४ पासून निर्वाह भत्ता देणे आवश्यक आहे. सबब, मी या सर्व चर्चेनुसार मुद्दा क्र.४ च्या उत्तराकरिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. जाबदेणार याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रस्तुत अर्ज दाखल दिनांक ३१/०७/२०२४ पासून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ५००/– इतका निर्वाह भत्ता द्यावा.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.07.17 17:30:30 +0530

इंदापूर.
दिनांक – १७/०७/२०२६

(प्र.चं. बारटक्के)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे.

<table>
<tr><td colspan="2"> <u>प्रमाणपत्र</u> मी याद्वारे असे प्रमाणीत करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकूराच्या शब्दानुसार समान आहे.</td></tr>
<tr><td>न्यायालयाचे नाव</td><td>.. श्री.प्र.चं.बारटक्के.<br>सह दिवाणी न्यायाधीश क स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर, ता. इंदापूर, जि.पुणे.</td></tr>
<tr><td>लघुलेखकाचे नाव</td><td>.. एस. एल. तांबोळी,<br>लघुलेखक निम्नश्रेणी -३</td></tr>
<tr><td>आदेशाची तारीख</td><td>.. १७/०७/२०२६.</td></tr>
<tr><td>न्यायालयाने सही केल्याची तारीख</td><td>.. १७/०७/२०२६.</td></tr>
<tr><td>आदेश अपलोड केल्याची तारीख</td><td>.. १७/०७/२०२६.</td></tr>
</table>